**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव**

**प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४**

**(मालमत्ताकर संकलन व निर्धारण विभाग)**

**दिनांक: ०३/०६/२०२६**

**विषय:** जळगाव शहर महानगरपालिकेत प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत घेण्यात आलेले निर्णय, मंजूर कामे, आर्थिक व्यवहार व प्रशासकीय कारभार याबाबत सविस्तर श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्याबाबत.

**संदर्भ:** १. मा. आयुक्त यांचा कार्यालयीन आदेश क्र. जमपा/प्रमुख का./४२७०, दिनांक ३०/०३/२०२६

२. सन्मा. नगरसेविका सौ. वैशाली अमित पाटील यांचा दिनांक ०४/०३/२०२६ चा अर्ज

**उपरोक्त विषयांशी संबंधित प्रकरणी, प्रभाग समिती क्र. 01 ते 04 कडील माहिती पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे:**

जळगाव शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्र. 01 ते 04 अंतर्गत सर्व मिळकतींचा मालमत्ताकर व पाणीपट्टी निर्धारण व संकलनाचे कार्य करण्यात येते. सन 2023-24 ते सन 2025-26 या आर्थिक वर्षातील कर मागणी, वसुलीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

| सन | मागणी (रु. कोटी) | वसुली (रु. कोटी) | एकूण मिळकती संख्या |
|---|---|---|---|
| 2023-24 | 218.84 | 107.00 | 1,32,313 |
| 2024-25 | 227.42 | 98.05 | 1,33,721 |
| 2025-26 | 239.34 | 86.44 | 1,34,985 |

जळगाव शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताकराचे फेरमूल्यांकन सन 2003 पासून करण्यात आलेले नव्हते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार दर पाच वर्षांनी फेरमूल्यांकन करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन 2021-22 या आर्थिक वर्षाच्या अखेरीस फेरमूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण करून सुधारित मागणी देयके वितरित करण्यात आली.

फेरमूल्यांकनपूर्व कालावधीत (सन 2021-22 पर्यंत) वार्षिक कमाल वसुली सुमारे रु. 55 कोटी इतकी होती. फेरमूल्यांकनानंतर वसुलीत लक्षणीय वाढ झाली आहे. तथापि, मागील काही वर्षात अनुभवी अधिकारी व कर्मचारी सेवा निवृत्त झाल्यामुळे उपलब्ध मनुष्यबळात घट झाली आहे. परिणामी, एकाच अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे एकापेक्षा अधिक कामांचा कार्यभार असल्याने वसुलीवर प्रतिकूल परिणाम झालेला दिसून येतो.

याशिवाय, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर निवडणूक कामे (BLO), जनगणना व इतर शासकीय जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्याने कर वसुली कार्यात अडथळे निर्माण झालेले आहेत.

सदर विभागातील अपुरे व संगणकीय ज्ञान मर्यादित असलेले मनुष्यबळ यामुळे मालमत्ताकर व पाणीपट्टी संबंधित वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे बाह्य खाजगी अभिकर्त्यामार्फत करण्यात येत आहेत. सदर कामाची मुदत सन 2023-24 मध्ये संपुष्टात आली होती. नवीन ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, मा. आयुक्त यांच्या मान्यतेने तत्कालीन अभिकर्ता मे. स्थापत्य कन्सल्टन्सी, अमरावती यांना मुदतवाढ देण्यात आली होती.

त्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबवून सन 2025-26 व 2026-27 या कालावधीसाठी प्रशासकीय आदेश व कार्यादेशानुसार पात्र निविदाकार मे. स्थापत्य कन्सल्टन्सी, अमरावती यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर अभिकर्त्याकडून पुढीलप्रमाणे कामे करण्यात येतात:

- संगणकीय प्रणाली (सॉफ्टवेअर) उपलब्ध करून देणे
- डेटा क्लाऊडवर सुरक्षित साठवण व जतन
- मागणी देयकांची (मल्टीकलर) छपाई व वितरण
- मागणी व वसुली नोंदवही (रजिस्टर) उपलब्ध करून देणे
- एसएमएसद्वारे कर सवलती व सूचना प्रेषित करणे
- थकबाकीदारांसाठी नोटीस छपाई
- मालमत्तेतील बदल व हस्तांतरण नोंदी प्रणालीत अद्ययावत करणे

वरीलप्रमाणे माहिती संदर्भ क्र. 01 नुसार प्रमुख कार्यालयाकडे सादर करण्यात येत आहे.

03/06/26

(धनश्री शिंदे)

उपायुक्त (महसूल)

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

Scanned with OKEN Scanner

